पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे
अंक १५ वा
६ डिसेंबर १९९४

शेतकरी

महिला आघाडी

## संयुक्त अधिवेशन
## ११-१२ नोव्हेंबर १९९४
# वृत्तांत

शेतकरी संघटना

**शेतकरी संघटनेचे ६ वे व शेतकरी महिला आघाडीचे चौथे संयुक्त अधिवेशन नागपूर येथे ११, १२ नोव्हेंबर १९९४ रोजी संपन्न झाले. या अधिवेशनाचा संक्षिप्त वृत्तांत अधिवेशनास येऊ न शकलेल्या शेतकरी भावाबहिणींसाठी देत आहोत.**

**निमंत्रिताचे प्रतिनिधी अधिवेशन :**
**११ नोव्हेंबर १९९४ सकाळी ११ वा.**

दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता पं. वसंतराव देशपांडे सभागृहात शेतकरी संघटनेचे निमंत्रितांसाठी असलेले प्रतिनिधी अधिवेशन सुरू झाले. अधिवेशनाचे **स्वागताध्यक्ष श्री. पी. एस्. ठाकरे** यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीला अनुरूप निर्णय अधिवेशनात घेतले जातील अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''स्वातंत्र्य मिळेपर्यंत साबरमतीला परत येणार नाही असा पण करून साबरमतीहून म. गांधी निघून वर्ध्याला आले. ते परत साबरमतीला गेले नाहीत. खरे स्वातंत्र्य न मिळाल्यामुळे ते गेले नाहीत. या अधिवेशनाच्या निर्णयातून खरे स्वातंत्र्य मिळावे व निदान बापूजींच्या आत्म्याला सेवाग्रामहून साबरमतीला जायला मिळावे.''

**दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता संघटनेचा ध्वज खुल्या अधिवेशनासाठी उभारलेल्या भव्य व्यासपीठासमोर डौलाने फडकू लागला.**

यानंतर अधिवेशनाचे कार्याध्यक्ष **श्री. राम नेवले** यांनीही उपस्थितांचे स्वागत करून अधिवेशनाच्या तयारीचा अहवाल सादर केला व सर्व सहकाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. **शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पाशा पटेल** यांनी सर्व माजी अध्यक्षांनी व किसान समन्वय समितीचे अध्यक्ष बिपीनभाई देसाई यांनी मार्गदर्शन करावे असे आवाहन केले. आपल्या भाषणात पाशा पटेल म्हणाले, '१९८० मध्ये शेतकरी संघटनेने सांगितलेली गोष्ट १९९२- ९३ मध्ये गॅट संदर्भात सरकारने दिलेल्या आकडेवारीने सिद्ध केली. शेतकरी संघटनेचा विचार योग्य वेळीच मानला गेला असता तर देशाची आजची बिकट अवस्था आली नसती. शेतकरी संघटनेचा विचार हा देश वाचवणारा विचार आहे आणि ह्या विचाराला आपण साथ देऊ शकतो हे आपले भाग्य आहे.'

यानंतर विविध वक्त्यांनी व्यक्त केलेले विचार असे –

### श्री. बिपीनभाई देसाई (गुजरात)

बापूजींना एकदा कमलनयन बजाज यांनी प्रश्न केला होता की नेहरू आणि तुमच्यात फरक काय? तेव्हा त्यांनी उत्तर दिले होते की, नेहरूंच्या मते अंग्रज जायला हवेत पण अंग्रेजीयत (इंग्रजपणा - इंग्रजांची पद्धत) रहायला हवी. तर माझे म्हणणे असे की इंग्रज राहिले तरी चालेल पण अंग्रेजीयत जायला हवी. आज बापूजींचे म्हणणे खोटे ठरले आहे. नेहरूंचे खरे झाले आहे. इंग्रजांच्या नीतीने शेतकऱ्यांचे दरवर्षी २४,००० कोटी रुपयांचे शोषण होते आहे. इंग्रजांच्या तोडा आणि फोडा नीतीने समाजाचे तुकडे पडत आहेत आणि शेतकऱ्यांचे शोषण चालूच आहे. बापूजींच्या कल्पनेतील स्वराज्यात शेतकऱ्याचे मस्तक उंच राहावे असे अभिप्रेत होते, पण तसे झाले नाही. बापूजींचे अपुरे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी खरं तर सर्वांची. पहिली संधी कारखानदारांना आणि नोकरशाही अधिकाऱ्यांना मिळाली. त्यांना ती जबाबदारी पेलता आली नाही. उलट, देश काही पावले मागे गेला. आता शेतकऱ्यांना संधी मिळाली पाहिजे. सुदैवाने शेतकऱ्यांना शरद जोशींसारखे नेतृत्व मिळाले आहे. शेतकऱ्यांनी ही जबाबदारी पेलणे आवश्यक झाले आहे. शरद जोशींना साथ देण्याची शक्ती परमेश्वराने आपल्याला द्यावी ही प्रार्थना.

### श्री. रामचंद्रबापू पाटील (माजी अध्यक्ष)

शेतकरी संघटनेची वाटचाल थातूर मातूर कार्यक्रमांच्या नाही, तर महत्त्वाच्या आर्थिक कार्यक्रमांच्या आधारे झाली आहे. महात्मा गांधींचा खरा वारसा संघटना चालवते आहे. म. फुल्यांचे तत्त्वज्ञान, शिवाजी महाराजांचा गनिमी कावा व डॉ. आंबेडकरांचा विचार याचा वारसा शेतकरी संघटना चालवते आहे. डंकेल प्रस्तावाच्या चर्चेमध्ये बाहेर आलेले विदारक सत्य दडपण्याचा प्रयत्न काँग्रेसबरोबर विरोधी पक्षही करत आहेत. राज्य सरकार रोज नव्या घोषणा करत आहे. या दोन्हीला उत्तर देण्याची जबाबदारी आपल्या फौजेवर आहे. शेतकरी संघटनेचं आजचं वय १६ वर्षे; म्हटलं तर धोक्याचं, म्हटलं तर मोक्याचं. या वेळी राजकीय आघाडीवरही काम करणे आवश्यक आहे. कोणत्याही पक्षांना पाठिंबा देणे वगैरे प्रकार या वेळी नकोत. आपल्यालाच निवडणुकांना सामोरं जावं लागेल. देशाला एक नवा विचार, शेवटचा मंत्र देणारं, शेतकरी संघटनेला सर्वात उंच पातळीवर नेणारं हे अधिवेशन ठरेल यात शंका नाही.

**स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांचा सोहळा अनुभवण्यास आलेले पंजाब व हरयाणातील शेतकरी भाऊबहिणी**

**श्री. भास्करराव बोरावके (माजी अध्यक्ष)**

गेली १६ वर्ष कुठेही न थांबता, यशाचा एक एक टप्पा पार करत आपली वाटचाल चालू आहे. ही वाटचाल त्यागावर आधारलेली आहे. महिलांचा प्रश्न निर्भयपणे मांडण्यात आपण यशस्वी झालो आहोत. मुक्त अर्थव्यवस्थेला सर्वप्रथम पाठिंबा आपणच दिला. मुक्त अर्थव्यवस्था देशाने स्वीकारली खरी, पण साखरेची आयात, कापूसकांदा-निर्यातबंदी अशा उदाहरणांवरून ती अर्थव्यवस्था पाळली जात नाही असेच लक्षात येते. त्याविरूद्ध आवाज उठवणे आवश्यक झालं आहे. म्हणून या अधिवेशनानंतर वेगळी क्रांतीकारक वाटचाल करणे आवश्यक आहे.

**श्री. रंगराव मोरे (माजी उपाध्यक्ष)**

१९८४ मध्ये परभणी अधिवेशनात आपण म्हणालो की ''सौराज्य मिळवायचं औंदा'. त्या वर्षी आपण सफल झालो नाही. पण काही पावलं आपण पुढे गेलो. त्यावेळी आपण म्हणालो की गरीबी टिकवण्याचे (न हटवण्याचे) प्रयत्न सरकारने सोडले तर गरीबी आपोआप हटेल. आजही ते खरं आहे. गेल्या काही वर्षात काही शेतमालांचे भाव वाढले आहेत. पूर्ण स्वातंत्र्यासाठी शेतकरी उद्योजक बनणे ही काळाची गरज झाली आहे. आम्ही राजकारणी नाही, पण शेतीमालाच्या भावाचे राजकारण जरूर करू. याचसाठी वेळोवेळी राजकीय पक्षांना पाठिंबा देणे इ. प्रकार आपण केले. पण आता मात्र स्वतंत्रपणे उभे राहणे आवश्यक आहे.

यानंतर, शरद जोशींनी त्यांच्या विस्तृत भाषणात देशातील आर्थिक व राजकीय परिस्थितीचा पट मांडून दाखवला व शेतकऱ्यांनी कोणती भूमिका निभावली पाहिजे याचे विश्लेषण केले.

**श्री. शरद जोशी**

– आजचे प्रतिनिधी अधिवेशन जाजम, गालिचे घातलेल्या वातानुकुलित सभागृहात घेत आहे. या वेळी मला स्वातंत्र्यवीर सावरकरांची आठवण होत आहे. अंदमानात खाऱ्या पाण्याने, अतिशय कमी पाण्यात आंघोळ करताना सावरकरांना वाटून गेलं की पूर्वी युरोपात सुगंधी पाण्याने साग्रसंगीत आंघोळ केली आहे. आज अशीही करू. आपण आज सुखात अधिवेशने भरवतो आहोत, या पुढच्या आंदोलनात, तुरुंगवासात या सुखाच्या आठवणी आपल्या सोबत असतील.

– औरंगाबादचे अधिवेशन भूकंपाच्या पार्श्वभूमीवर होत होते. आजच्या अधिवेशनावर प्लेगचे सावट आहे. प्लेगच्या प्रसारामुळे अवघ्या चार दिवसात देशाची व्यापारी दारे बंद झाली. जग भारताकडे संशयाने बघू लागले. हिंदुस्थानशी व्यापारी संबंध ठेवावेत की नाही याची जगाला शंका वाटू लागली.

अशीच शंका बाबरी मशीद पाडली गेली, त्यानंतर दंगे, बॉम्बस्फोट झाले? तेव्हा जगाला वाटू लागली होती. मशीद पाडली गेली, नंतर लोक एकमेकांच्या उरावर बसले. अशा देशाशी व्यापारी संबंध ठेवावेत का? असे जगाला वाटू लागले.

जे जे काही आर्थिक क्षेत्रात असू नये ते सर्व या देशात आहे. बेकारी, कर्जबाजारीपणा, निरक्षरता, गुंड व नेत्यांचे उघड हस्तांदोलन या सर्व गोष्टी आहेत. या परिस्थितीचा अर्थ काय?

सध्याचे देशातले चित्र हे चर्चिलचे भाकित खरे ठरवणारे आहे. भारताला स्वातंत्र्य देऊ नये असं आग्रहाने सांगताना चर्चिल म्हणाला होता, 'या लोकांना स्वातंत्र्य देऊ नका. पन्नास वर्षांत यांची कायदा आणि

**उन्हाची तिरीप चुकवीत प्रतिनिधी अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रातील भाषणे तल्लीनतेने ऐकत बसलेले संघटना पाईक स्त्रीपुरुष**

सुव्यवस्था मोडून पडेल आणि लोक एकमेकांच्या उरावर बसतील.' चर्चिलचे भाकित खरे होऊ लागले आहे.

शेतकरी आंदोलनाचा गाभा 'गांधीजींचा आत्मा साबरमतीला परत जाऊ शकेल का' या प्रश्नाच्या उत्तरात आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर बापूंना साबरमतीला परत जावसं वाटत होतं का आणि आज तरी बापूंच्या आत्म्याला परत जोवेसे वाटेल का?

आज भारताचा जगात खालून पाचवा नंबर आहे. इथिओपिया, सोमालिया, रवांडा आणि हैती हे चार देश भारताखाली आहेत. हिंदुस्थानात या प्रकारची यादवी होईल हे म. ज्योतिबा फुल्यांनी १८८८ मध्ये राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळी सांगितले होते. 'राष्ट्रीय सभा (नॅशनल कॉंग्रेस) व्हायची असेल तर राष्ट्र (नेशन) असायला हवे. असे 'एकमय लोक' या अर्थी राष्ट्र आधी तयार होऊ द्या मग कॉंग्रेस करू. इंग्रज जाणार आहेतच, पण त्यांना शूद्राची मुले शिकून शहाणी झाल्यावर जाऊ द्या. नाहीतर परत पेशवाई येईल, शूद्रांचे हाल चालूच राहतील. चंपारण्य अंदोलनाच्या वेळी म. गांधी म्हणाले होते की, 'या देशाच्या आम रयतेचे शोषण इंग्रज व शहरवासीय (Town people) मिळून करत आहेत आणि या पापाचा झाडा या शहरवासियांना एक दिवस देवाच्या दरबारात द्यावा लागेल.

### दोन प्रश्न महत्त्वाचे आहेत

१. गांधीचींचे, सर्वसामान्य माणूस सुखी, समाधानी होण्याचे स्वप्न का साकार झाले नाही?

२. देश प्रगतीच्या शिखराला जाण्याऐवजी घसरगुंडीला का लागला?

पहिल्या प्रश्नाचं उत्तर गोरा इंग्रज जाऊन काळा इंग्रज आला, शोषण चालूच राहिलं या शेतकरी संघटनेच्या मांडणीत आहे.

दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर शोधणे आवश्यक आहे. खरं तर या प्रश्नांची उत्तर सत्तारूढ पक्ष किंवा इतर राजकीय पक्षांनी शोधून काढली पाहिजेत. पण आज एकही पक्ष किंवा संघटना अशी उत्तरं शोधताना दिसत नाही. सत्तारूढ पक्षाला एक दिशा, एक विचार असं काहीच नाही. ज्या ज्या वेळी जे जे सोयीस्कर ते करावे आणि खुर्ची सोडू नये या पलीकडे सत्तारूढ पक्षाचं शहाणपण जात नाही. समाजवाद, खुली व्यवस्था, मध्यममार्ग असं काहीही तत्त्वज्ञान मांडलं जातं. विरोधी पक्ष देशाच्या घसरणीचा विचार करत नाहीत. मंडल आयोग, मस्जिद-मंदिर वाद अशा निरनिराळ्या वादात ते मश्गुल आहेत. ते वादच त्यांना महत्त्वाचे वाटतात. कदाचित्, आर्थिक धोरणांबद्दलचे विचार त्यांनी स्पष्टपणे मांडणे, राजकीय पक्षांच्या सोयीचे नसावे.

रशिया आज बिकट परिस्थितीतून जातो आहे. एकेकाळी १ डॉलर व १ रूबलची बरोबरी होती. सध्या १००० रूबल देऊनही एक डॉलर मिळणे अवघड आहे. पण रशियाचा विचार पक्का झाला आहे. समाजवाद आणि सरकारी हस्तक्षेप यामुळे वाटोळेच होते. देश वर येऊ शकत नाही. पूर्ण वाटोळे झालेला देश पक्का विचार ठेवून प्रगती करेल. भारताने भेसळयुक्त समाजवाद स्वीकारला त्यामुळे आपण अर्धमेले होऊन बसलो आहोत. नागपूरच्या कॉंग्रेस अधिवेशनात नेहरूंनी मांडलेला शेतीच्या सहकारी-सरकारीकरणाचा ठराव मानला गेला असता तर आपली अवस्था रशियासारखी झाली असती. भेसळयुक्त समाजवादाने आपणच अर्धमेले झालो.

आपले विद्यमान पंतप्रधान मोठे

**स्वातंत्र्याचा हुंकार भरण्यास उधाणलेल्या जनसागराचा एक पंचमांश**

मुत्सदी म्हणून प्रसिद्ध झाले आहेत. ते समाजवाद चांगलाच आहे म्हणतात. त्याचवेळी खुली अर्थव्यवस्थाही चांगलीच आहे, आम्ही तिकडेच चाललोय असंही म्हणतात.

देशाच्या आजारावरचं औषध काय याची स्पष्टता कोणाकडेच नाही. अंधःकारातून वाट दाखवण्याची जबाबदारी शेतकऱ्यांकडे येते आहे. जेव्हा भल्याभल्यांना परिस्थितीचे आकलन होत नव्हते तेव्हा शेतकरी आंदोलनाने दिशा दाखवली. अनेकांनी शेतकरी संघटनेच्या भूमिकेवर टीका केली, पण वर्षा-दोन वर्षातच शेतकरी आंदोलनाने दाखवलेली दिशी खरी ठरली. याचे अनेक दाखले देता येतील.

डंकेल प्रस्तावाला उघडपणे पाठिंबा देणारी शेतकरी संघटना एकटी होती. प्रस्तावाचा विरोध करणारे सरकारी तबेल्यातले अर्थशास्त्रज्ञ आत डंकेल प्रस्तावाचं समर्थन करू लागले आहेत.

शेतकऱ्याची गरीबी आणि कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक लुटल्यामुळे आहे; नेहरूनीतीमुळे आहे. हे शेतकरी संघटनेने पूर्वीच सांगितले. आता ते गॅटला सरकारने दिलेल्या आकडेवारीवरून सिद्ध झाले आहे. जगात सर्वत्र सरकारी हस्तक्षेप जितका कमी तितकी अर्थव्यवस्था चांगली हे सर्वमान्य होत आहे. शेतकरी संघटनेने हे आधीच सांगितलं आहे. सरकारने गरीबी हटू नये म्हणून होणारे प्रयत्न थांबवावेत, गरीबी आपोआप हटेल हे शेतकरी संघटनेने सुरुवातीपासूनच सांगितले. सरकार आवश्यक आहे ते शत्रूंचा आणि चोराचिलटांचा बंदोबस्त करायला. तेवढंच सोडून सरकार सर्व काही करते आहे. डंकेल प्रस्तावावर सही केली आहे. याचा अर्थ सिद्धान्ततः नेहरूंनी देशाचे वाटोळं केलं आहे, नेहरूवाद चूक आहे, खुल्या अर्थव्यवस्थेला पर्याय नाही हे (देशाने) राज्यकर्त्यांनी कबूल केले आहे. तरीही डंकेल प्रस्तावाचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत येऊ द्यायचे नाहीत असं धोरण सरकार जाहिरपणे राबवतं आहे. याचीही अनेक उदाहरणे देता येतील.

* धानाचा भाव ३८० रु. क्विंटल जाहिर केला असतानाही पंजाबातला प्रत्यक्ष भाव ३६० हून जास्त नाही, हरियाणात सरकारने धानाची खरेदी बंद ठेवली आहे, महाराष्ट्रात आदिवासी भागात ३००-३१० ला धानाची खरेदी होते आहे.

* कांदा निर्यातीवर १९८० प्रमाणेच बेमुर्वतखोरपणे बंदी घातली गेली.

* साखरेची लेव्हीची किंमत महाराष्ट्र व गुजराथमध्ये कमी केली गेली. ऊस शेतकऱ्यांवर ऊस कमी भावाने विकण्याची सक्ती होते आहे.

* कपाशीचा भाव परदेशात ४२५० रु. क्विंटल इतका असताना कपाशीचा निर्यातीवर बंदी आहे. देशात इतरत्र कपाशीचा भाव ३१०० रु. तर महाराष्ट्रात फार तर २००० रु. आहे.

* विजेचे भाव वाढवण्याचे कार्यक्रम चालू आहेत.

शेतकऱ्याची उणे सबसिडी (-७२%) वाढवण्याचे कार्यक्रम योजले जात आहेत.

* कर्जवसुलीचे पठाणी प्रकार सुरू झाले आहेत. कर्जापोटी कुलूपबंद घरे उघडून घरातल्या वस्तू घेऊन जाणे सुरू झाले आहे.

हे सर्व प्रकार सरकार खुल्या अर्थव्यवस्थेचा उद्घोष करत असताना, गॅट करारावरील सहीची शाई वाळायच्या आत होत आहेत.

ही परिस्थिती सुधारायला वेळ

**— आणि एक पंचमांश**

अतिशय मर्यादित आहे. मशीदविध्वंसाने पहिली धोक्याची घंटा वाजली, प्लेगने दुसरी घंटा वाजली आहे. अनैसर्गिक आणि रोगिष्ट शहरीकरणामुळे प्लेग नव्हे तर एड्स्‌च्याही शक्यता वाढत आहेत. कार्यक्षम शासन आलं नाही तर देश व्यापारी दृष्टीने जगाला कायमचा अस्पृश्य होऊ शकतो. परिस्थिती सुधारण्यासाठी सहा महिने - वर्षाचाच कालावधी उपलब्ध आहे. देश बुडतो आहे. मात्र तो सर्वसामान्यांनी मनावर घेतलं तर वाचू शकेल.

गांधीहत्येचा फायदा हिंदुत्ववाद्यांना मिळाला नाहीच, तो समाजवादी सरकारवाद्यांना मिळाला ही इतिहासाची साक्ष आहे. नेहरूंच्या धोरणांचं कौतुक करणाऱ्यांच्या देशभक्तीविषयी शंका घेतली पाहिजे. परिस्थिती सुधारायची असेल तर गेल्या पन्नास वर्षांचं समाजवादाचं, नेहरूवादाचं ओझं फेकून दिलं पाहिजे.

आजपर्यंत जिथं जिथं समस्या असेल तिथं तिथं सरकारचे हात बळकट करा असं म्हटलं जायचं. यापुढं जिथं जिथं सरकारचा हस्तक्षेप असेल तिथं तिथं सरकारचे हात छाटून टाका असा कार्यक्रम जनतेने घ्यायला हवा.

आपण जर ठरवलं तर तीन वर्षात परिस्थिती बदलू शकतो. देश वाचवू शकतो. पण यासाठी या बदलाला राजी न होणारे नोकरशहा, लायसेन्स-परमिट पद्धतीचा फायदा मिळवून कमिशन खाऊन गब्बर झालेले राज्यकर्ते, बंदिस्त बाजारपेठेचा फायदा उठवून गब्बर झालेले उद्योजक, देशाच्या आर्थिक परिस्थितीची सुतरामही जाणीव न ठेवणारे मंदिरवादी, मस्जिदवादी, मंडलवादी हे सर्व देशाचे दुष्मन आहेत हे मनावर पक्के ठसवले पाहिजे.

आपले उद्दिष्ट नेहरूवादी व्यवस्थेची डागडुजी नाही. कारण ते देशाच्या हलाखीवरचे उत्तर नाही. व्यवस्थाच उधळून द्यावी लागेल व तीही सहा महिन्यात उधळून द्यावी लागेल.

* * *

यानंतरच्या सत्रात **माजी अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे, शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर** यांची भाषणे झाली. **शंकर धोंडगे** यांनी आगामी लढाई हे कुरूक्षेत्र असून त्यासाठी सर्वांना तयार रहाण्याचे आवाहन केले आणि राजकीय आघाडीवर स्वतःच्या ताकदीने लढायचे आवाहन केले. **सौ. सरोज काशीकर** यांनी शेतकरी संघटनेच्या लढाईमधील महिलांच्या सहभागाची पार्श्वभूमी विषद केली आणि पुढील लढाईतही महिला सहभागी होतील याची ग्वाही दिली.

प्रतिनिधी अधिवेशनाच्या समारोपाच्या भाषणात श्री. शरद जोशी यांनी तीन नव्या शेतकरी प्रकाशनांची माहिती दिली. ही प्रकाशने म्हणजे श्री. अजित नरदे यांनी लिहिलेली शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेबद्दलची पुस्तिका, राजकीय भूमिकेचा इतिहास विषद करणारा 'शेतकरी संघटक'चा विशेषांक आणि महिला आघाडीने लिहिलेली महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाची चिकित्सा करणारी 'दळभद्री चिंधी' ही पुस्तिका आपल्या भाषणात शरद जोशींनी राजकीय धोरणांबाबत त्यांच्या व्यक्तिगत सहभागाविषयी एक महत्त्वाचा मुद्दा विषद केला.

''मी स्वतःसाठी मतं मागायला आलो तर मला जोड्यानं मारा असं प्रथमपुरूषी एकवचनी विधान मी केलं होतं. त्या विधानाला एक पार्श्वभूमी होती. शेतकरी

**(पान १४ पहा)**

**कर्जच नाही तर कर्जमुक्ती कशाची? हे 'लूट वापसी'चे आंदोलन आहे असे शरद जोशींनी सांगताच निर्धाराच्या मुठी उभारून गरजणारा जनसागर**

# ही चिथावणी नव्हे, नेहरू-नीतीला चपराक!

**— नाना देवतळे**

**सिरसगाव कसबा, जि. अमरावती**

दि. २१-१०-९४ च्या तरुण भारतचे 'शरद जोशी यांची चिथावणी' हे संपादकीय वाचले. पं. नेहरू, श्रीमती गांधी व राजीव गांधी यांच्या पुतळ्यांचे भविष्यातील पतन ह्या कल्पनेने गदगदून आलेल्या संपादकांनी सात्विक संतापाने शरद जोशींवर केलेली टीका बघून काँग्रेसची मंडळी तर संतुष्ट झाली असणारच, पण शेतकरी संघटनेच्या कट्टर विरोधकांचा ऊरही भरून आल्यास आश्चर्य कसले? पण उत्साहाने उत्तेजित होत संपादकाने जी कमालीची आश्चर्यकारक आणि विपर्यस्त विधाने केली आहेत, त्यांचा परामर्श घेणे निकडीचे वाटते.

**पुतळे-थोरांचे आणि नेत्यांचे**

समाजात राहून समाजाचा सर्वांगीण उत्कर्ष करण्यात ज्यांची उभी हयात खर्ची पडली अशा धुरंधर, युगंधर, श्रेष्ठ व्यक्तीला सामाजिकदृष्ट्या थोर संबोधिले जाते. थोरांच्या थोरवीची प्रेरणा समाजपुरुषाला सदैव स्फूर्ती देणारी असावी, या उद्देशाने प्रतीक म्हणून पुतळ्यांची योजना आहे. जगभर त्या त्या देशातील मान्यवर थोरांचे पुतळे आढळतात; भारत ह्याला अपवाद असणे शक्य नाही. पण आपला प्रकार फार अजागळ. स्वातंत्र्योत्तर सत्ता भोगलेल्या सत्ताधीशांना व नेत्यांना सत्तेच्या गुलामांनी आपापल्या पसंतीने थोरांच्या पुतळ्यांच्या पंक्तीत बसविले. पुतळ्यांच्या भाऊगर्दीने भरभराटलेली भारतातील ही प्रतीके पशुपक्ष्यांचे निवासस्थान आणि जाहिरातीचे मोक्याचे स्थळ ठरलीत. केवळ जयंती आणि पुण्यतिथीनिमित्त उद्धार होणारी ही प्रतीके समाजाला कोणता आदर्श देतात, याचे स्पष्ट उत्तर मात्र नकारार्थी आहे. कारण, ज्यांनी प्रश्नच प्रश्न निर्माण करून ठेवले आहेत, त्याचे उत्तर देण्याचे धाडस कोण दाखविणार? स्वप्निल दुनियेत रममाण होत ह्या देशाची नौका आंधळेपणाने खडकावर आदळणाऱ्यांची पाठराखण खुलेपणाने करण्याची हिम्मत कोण दाखविणार? १९४७ नंतर ह्या देशाची सूत्रे काँग्रेसकडे पर्यायाने नेहरूंकडे होती. विशिष्ट स्वप्नरंजनात मश्गुल होत रशियाच्या उत्कर्षाने प्रभावित झालेल्या नेहरूंनी समाजवादी समाजरचनेचा ध्यास घेतला. स्व. इंदिरा गांधी आणि राजीव गांधी ह्या मातापुत्रांनी त्याच ध्यासपूर्तीसाठी आपली कारकीर्द खर्ची घातली. ४० वर्षांची सत्ता उपभोगण्याचा कालखंड मिळाल्यानंतरसुद्धा भारताची अवस्था दयनीय असणे हे निश्चित अभिमानास्पद नाही. १९४४ ला दुसऱ्या महायुद्धाने बेचिराख झालेल्या जपानने जगभर आपला दबदबा निर्माण केला, तर चीनने लोकसंख्येचे भले मोठे ओझे पेलीत स्वतःचे सामर्थ्य आणि शक्ती प्रचंडरीत्या वाढविली. मात्र, चार दशकांचा अवधी मिळूनही नेहरू घराण्याने भारताला जगाच्या नकाशात शेवटचे स्थळ मिळवून दिले. स्व. महात्मा गांधींच्या स्वप्नांचा चक्काचूर करीत 'इंडियाचा' उत्कर्ष करणारे 'भारताला' मात्र दारिद्र्याच्या खाईत लोटतात हे सत्य स्पष्ट असताना पुतळ्यांचा सोस कशाकरिता व का?

**रशियाची दैवते**

कार्ल मार्क्स् व लेनीन ही रशियाची महान दैवते. मार्क्सवादाच्या प्रभावाने प्रभावित झालेल्या रशियाने साम्यवादी समाजरचनेचा अंगीकार केल्यानंतर एका जबरदस्त पोलादी चौकटीच्या शृंखला तोडण्याचे धाष्टर्य गोर्बाचेव्ह यांनी दाखविले आणि रशियाचे पतन चव्हाट्यावर आले. पोट भरण्यासाठी साध्या ब्रेडच्या मोबदल्यात रशियन स्त्रीला रस्त्यावर येऊन देहविक्रय करण्याची पाळी आली, तेव्हा साम्यवादाचे

## 'नेहरूनीती'लोभी?

गांधीजी म्हणत, 'अंग्रेजां'ना राहायचं असेल तर राहू द्या पण 'अंग्रेजियत' गेली पाहिजे. जवाहरलालजींना मात्र 'अंग्रेजियत' राहावी पण 'अंग्रेज' जावा असे वाटे. आणि 'अंग्रेज' गेल्यावर त्यांनी 'अंग्रेजियत' टिकवून ठेवली.

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसेतर पक्षांनी आणि शक्तींनी काँग्रेस पक्ष देशाचा कारभार चांगला करीत नाही, आमच्या हाती तो आला तर आम्ही देश मार्गावर आणू असं म्हणत सातत्यानं काँग्रेसला विरोध केला.

या सर्वांचा विरोध हा पंडितजींच्या 'अंग्रेजां'ना असलेल्या विरोधासारखाच आहे हे आता दिसू लागले आहे. नेहरूनीतीचा त्याग करणे खुल्या व्यवस्थेच्या संदर्भात आता अपरिहार्य बनले आहे. पण काँग्रेसेतर पक्ष आणि शक्ती खुल्या व्यवस्थेला सडसडून विरोध करीत आहेत. याचा सरळ अर्थ असा आहे की यांना 'नेहरूनीती' हवी आहे पण नेहरू (आणि त्यांचे काँग्रेसी वारस) नकोत. नागपूरच्या तरुण भारतच्या संपादकांनी २१ नोव्हेंबरच्या अंकात संपादकीय लिहून या अर्थाला दुजोरा दिला आहे.

गळू फुटले. एकेकाळच्या बलाढ्य रशियाचे विघटन झाले. व्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी करीत जोपासलेल्या साम्यवादाच्या प्रणेत्यांना रशियन जनतेने जाब विचारला, तसे कार्ल मार्क्स् व लेनीनचे पुतळे भुईसपाट झाले. काळाच्या कसोटीवर घासून पुसून भ्रष्ट झालेले संदर्भ एकाच झटक्यात जमीनदोस्त झाले. मग ४० वर्षे सत्तेची सूत्रे सांभाळणाऱ्या नीतीमध्ये भारताच्या दारिद्र्याचे मूळ दडलेले आहे, हे सांगण्याचे धाष्टर्य दाखविणारा चिथवणीखोर होतो का?

**अनाठायी टीका**

१२ व्या शतकातील बाबरी मशिदीचा प्रश्न तिचे पतन होऊनही आज कायम आहे. एका परकीय आक्रमकाच्या केवळ नावाशी संबंध असणारी ही वास्तू हयात असताना भारताच्या संस्कृतीत आणि तिचे पतन झाल्यानंतरच्या संस्कृतीत काहीही फरक पडलेला नाही. पण कडव्या हिंदुत्वाने आपली संपूर्ण शक्ती एकवटून पतन घडवून आणले. मशिदीचे प्रतीक नष्ट झाले ते उभ्या देशाच्या सहमतीने होते का? त्यावेळेस कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नाही का? नेहरू, इंदिराजींच्या पुतळापतनाने धास्तावलेल्यांना नम्रतेने स्मरण द्यावेसे वाटते की, २ ऑक्टोबर १९९२ ला संपूर्ण महाराष्ट्रातील ३० जिल्हास्थानी नेहरूनीती आणि नेहरूपुतळ्याचे दहन शेतकरी संघटनेने जाहिररीत्या केले होते. त्या वेळेससुद्धा कसलाही वाईट प्रसंग घडला नाही. कायद्याची परिभाषा केवळ शेतकरी संघटनेकरिताच आहे काय? असल्या अडचणीच्या प्रश्नांना उत्तरे नसतात. पण दुजाभावाने किंवा आकसाने निर्माण झालेल्या प्रश्नांना मात्र एकांगीपणे शब्दबद्ध केले जाते. तरुण भारतचे संपादकीय वाचून असे मनोमन वाटले म्हणून सर्व मुद्द्यांना सविस्तर उत्तर!

**संघटनेला शिवाजीची रणनीती प्रिय**

केवळ प्रसिद्धीसाठी शरद जोशी पुतळेभंजनाचे भाष्य करतात, हे विधान तर आश्चर्यकारक आहे. आक्रस्ताळे विधान करून तात्पुरती खळबळ उडवून देणे वेगळे. असली प्रसिद्धी अल्पकाळ टिकते. पण १४ वर्षांपासून आजपर्यंत लाखो शेतकऱ्यांना एका मंचावर विराजमान करणाऱ्या आवाजाला प्रसिद्धीसाठी तडफडण्याची गरजच नाही. औरंगाबाद अधिवेशनानंतर 'शरद शब्दांचे बुडबुडे' हे संपादकीय लिहून शरद जोशींच्या 'करा अथवा मरा' ह्या आदेशाची तरुण भारतने टर उडविल्यानंतर संघटनेने फेडरेशनचा एकाधिकार कायदा मोडून वाजत गाजत ५००-५०० वाहनांचा तांडा सीमेबाहेर नेऊन सीमा तोडो आंदोलन केले. कायदा परवानाप्राप्त दारू विक्रेत्यांकडून असतानाही अमरावती व अकोला जिल्ह्यांतील २५ दारू दुकानांना सील केले जाते व संघटनेकडून उध्वस्त करण्यात येते, ते केवळ प्रसिद्धीची हाव म्हणून? आंदोलन मागे घेण्याच्या शरद जोशींच्या पद्धतीवरील टीका तर सर्वथा अनाठायी आहे. आंदोलनाची रणनीती ही कुशल सेनापतीच ठरवितो. राणा प्रतापांनी मुगलांशी आमना सामना केला आणि एक शूर लढवय्या देशोधडीला लागला. उलट, जिंकलेले किल्ले परिस्थितीचा अदमास घेऊन औरंगजेबाला जिंकू देत शिवाजी महाराजांनी माघार घेतली, ती एक पळपुटे म्हणून नव्हे. संघटनेला शिवाजीची रणनीती अभिप्रेत आहे. तरुण भारत म्हणतो तोच न्याय बलाढ्य राजकीय पक्षांना व इतर संघटनांना लावला तर अनेक आंदोलने अर्धवट का सोडली जातात, याची उत्तरे कोण देणार? प्रसिद्धी ही बरळल्याने मिळत नाही. तर ती कर्तृत्वाच्या व योजकतेच्या मापदंडावर तोलली जाते आणि म्हणूनच प्रश्न कापसाचा असो की द्राक्षाचा, दारूचा असो की पुतळ्यांचा सारे जागरूक शेतकरी शरद जोशींच्या, आपण म्हणता तसे कच्छपी लागतात; कोणी पाटील असो की पोहरे किंवा जावंधिया असो की गोटे यांच्या नेतृत्वाने नव्हे. ज्याला नेतृत्वाची हौस आहे ते संघटनेच्या धावत्या गाडीतून उडी घेतात, चढणारे चढतात, स्टेअरिंग जोपर्यंत शरद जोशींच्या हातात आहे, तोपर्यंत गाडी मात्र धावणार! त्यामुळे मुंबईचे ठिय्या आंदोलन व पाताळगंगेचा कार्यक्रम का रद्द झाला हा प्रश्न हेतुपुरस्पर मांडला तरी शेतकरी संभ्रमित होण्याचे काही एक कारण नाही.

**आंदोलनाचे यश**

'उत्पादनखर्चावर आधारित भाव' ही मागणी शरद जोशींनी जेव्हा सर्वप्रथम केली तेव्हा सर्वच राजकीय पक्षांनी त्यांना वेड्यात काढले. आज हीच मागणी सर्वमान्य झाली आहे. संघटनेने कर्जमुक्तीची घोषणा केली आणि झाडून साऱ्या राजकीय पक्षांनी कर्जमुक्ती आपल्या निवडणूक जाहिरनाम्यात समाविष्ट केली. अमरावतीच्या महिला अधिवेशनात 'स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा समावेश' असावा, ही घोषणा झाली आणि सरकारने ३०% महिलांच्या राखीव जागा निश्चित केल्या. संपत्तीच्या वाट्यात महिलांचा १/४ वाटा असावा, ह्या अभियानानंतर सरकारने तसा कायदाच यावेळेस केला. संघटनेने दारूबंदी आंदोलन छेडले आणि पवार सरकारने ५०% स्त्रियांचे सहमत असल्यास दारूपरवाने रद्द करण्याचे धोरण जाहिर केले. खुल्या अर्थव्यवस्थेचे संघटनेने स्वागत केले आणि डंकेलला धन्यवाद दिले. देशात सर्वच स्तरातून प्रचंड विरोध होत असताना डंकेलचे स्वागत एकट्या शरद जोशींनी केले आणि आजचे चित्र काय आहे? खुल्या अर्थव्यवस्थेचे व डंकेलचे स्वागत सर्वजण चोरून का होईना पण करीत आहे. एक नव्हे अनेक, चळवळीचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम स्पष्ट असताना साप साप म्हणून भुई थोपटण्याचा प्रकार म्हणजे तरुण भारतचे संपादकीय होय, असे नाईलाजाने नमूद करावेसे वाटते!

**बळीराजाचा बळी**

नेहरू घराण्याचे पुतळे खाली ओढण्याच्या शरद जोशी यांच्या घोषणेची

कारणीमांसा अग्रलेखात करण्याची तसदी न घेता केवळ टीका करण्याचे कष्टच संपादकांनी घेतल्याचे स्पष्ट होते. स्वातंत्र्य मिळून ४५ वर्षांचा काळ पार पाडल्यानंतर-सुद्धा या देशातील शहर आणि खेडे यामधील आर्थिक अंतर का वाढत आहे? इंडियातील घटक सर्व सोयीसवलतीने युक्त अशा साधनांनी लिप्त आणि ग्रामीण भाग मात्र विपन्नावस्थेच्या सुळ्यावर उभा! कोण कारणीभूत आहे या परिस्थितीला? म. गांधींच्या रामराज्य कल्पनेला मूठमाती कोणी दिली? निवडणुकीपुरते म. गांधींना आळवायचे, जयंती-पुण्यतिथीला त्यांची आरती ओवाळायची आणि इतर वेळेस त्यांच्या तत्त्वांचा चुराडा करायचा ही आहे – नेहरूनीती. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, शेतकऱ्यांना किफायतशीर भाव दिल्यास शेतकरी शेतीच करणार नाही, तो आळशी होईल. हे धोरण अवलंबणाऱ्या नेहरूनीतीने शेतकऱ्यांना कर्जाच्या डोहात जे डुबवून ठेवले ते वर कधी निघू नये ह्या धारणेनेच! देशामधला सर्वात मोठा कर्जबाजारी असणारा घटक हा शेतकऱ्यांचा आहे. उत्पादनाच्या उच्चांक गाठणारा बळिराजा कर्जाच्या डोंगराखाली का दडपला आहे, याचा सांगोपांग विचार कोणी कधी केला? शहरी लोकांपेक्षा कष्ट करण्यात तो कमी पडतो का? ऑफिसमधले बाबू कूलरच्या थंड हवेत खर्डेघाशी करतात आणि एका हाती छत्री घेऊन शेतकरी रूमणे धरून बैल हाकलतो, का? सर्वात जास्त कष्ट आणि सर्वात जास्त अधिक दारीद्र्य आणि भरीला कर्जाचे गाठोडे, हे चित्र कुठवर राहणार? ह्याच नीतीचे अवघड गणित शरद जोशी सोप्या शब्दात सांगतात, म्हणूनच जागरूक शेतकरी त्यांच्या कच्छपी लागतात. पुतळ्यांची थोबाडे रंगविण्यास तयार होतात.

**डंकेलचा करिश्मा**

डंकेलविरूद्ध विरोधकांनी कितीही वाक्‌ताडन केले तरी ह्या महामानवाने भारतीय शेतकऱ्यांवर अनंत उपकार केले आहेत. भारत सरकारच्या शेतकरीविरोधी कुटील नीतीचा भंडाफोड केवळ डंकेलमुळे झाला. सर्व जगभरातील शेतकऱ्यांना मिळणारी सबसिडी ही समान तत्त्वावर आधारित असावी, ह्या न्यायाने डंकेलला दिलेल्या सबसिडीच्या आकडेवारीचा घोळ खूपच मनोरंजक आहे. जपान आपल्या देशातील शेतकऱ्यांना ९०% युरोपियन राष्ट्रे व अमेरिका ३५ टक्के सबसिडी देत असताना भारतानेसुद्धा ३.२ सबसिडी आम्ही शेतकऱ्यांना देतो असे कळविले. याचा अर्थ, भारतीय शेतकरी आपल्या शेतीवर १०० रु. खर्च करीत असेल, तर ३.२० पैसे भारत सरकार त्याला प्रोत्साहनपर म्हणून अधिक देते. अर्थात, या आकडेवारींनी डंकेलचे समाधान होणे शक्य नव्हते. दरम्यान स्टार टी. व्ही. वरून १ तासाची शरद जोशींची मुलाखत प्रसारित झाली. भारत सरकारच्या शेती-तुटीचे विदारक चित्र मांडल्यानंतर शासनाच्या कुटील नीतीची लक्तरे जगाच्या वेशीवर टांगली गेली. डंकेलच्या आदेशानुसार अर्थमंत्रालय व व्यापर मंत्रालयाच्या १० वर्षापासून दिल्या गेलेल्या आकडेवारीचा सुधारित गोषवार २३ फेब्रुवारी १९९४ ला मनमोहनसिंग आणि प्रणव मुखर्जी यांच्या सहीने डंकेलला सादर करण्यात आला. उणे ७२ टक्के सबसिडी आम्ही आतापर्यंत आमच्या शेतकऱ्यांना देत होते, हे दस्तावेजाच्या स्वरूपात सरकारने जेव्हा कबूल केले तेव्हाच १५ एप्रिल १९९४ ला डंकेल प्रस्तावावर भारताला सही करता आली आणि त्याच क्षणी वर्षाला २४ हजार कोटी रुपयांनी भारतीय शेतकऱ्याला विद्यमान सरकार लुटत होते, हे स्पष्ट झाले. याचा अर्थ देशातला शेतकरी आपल्या जमिनीवर १०० रु. खर्च करीत असेल तर केवळ २८ रु. च. त्याला मिळाले पाहिजे ही सरकारी नीती स्पष्ट झाली. भारतीय शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे, हलाखीचे आणि कर्जाचे कोडे एकाच झटक्यात सुटले. हेच गणित शरद जोशी सोप्या शब्दात सांगतात. इतरांना मात्र याची गंधवार्ताही नाही किंवा असल्यास सोईरसुतक मात्र निश्चित नाही.

**पुतळ्यांचे पतन का?**

नेहरू घराण्याचे पुतळे ओढण्याचे भाष्य केल्यानंतर नेहरू, इंदिराजींच्या नावावर ज्यांचे राजकारण व सर्वस्व अवलंबून आहे त्यांचा तीळपापड होणे साहजिकच. व्यक्तिपूजेचा हा एक आदर्श पण नखशिखांत ढोंगी नमुना! नेत्यांच्या व्यक्तिमत्वाच्या वलयाचा फायदा उठवीत स्वतःचा स्वार्थ साधणारी संस्कृती म्हणून काँग्रेसकडे अंगुलीनिर्देश करता येईल. कांशीराम, मायावतींनी म. गांधींची भरपूर विटंबना केल्यानंतर त्यांनाच पाठिंबा देण्याची प्रवृत्ती कोणत्या सरदारात मोडते? किंवा गांधींची अवहेलना करणारे छगन भुजबळ काँग्रेसचे नेते कसे काय होतात? ह्याचे स्पष्ट उत्तर काँग्रेसजनांजवळ नसेल तर नेहरू, इंदिराजींच्या पुतळ्यांचा कळवळा पुतना मावशीच्या भूमिकेतलाच म्हटला पाहिजे.

प्रदीर्घ काळ देशाची सत्तासूत्रे सांभाळीत सर्वोच्च स्थानी राहिलेल्या ह्या थोर मंडळींनी गरिबी हटावचा नारा देत भारताला मात्र दारिद्र्याच्या खाईत लोटण्याचे दुष्कृत्य केले. विकासाचे ढोल बडवीत खेडी भकास केलीत. शहराचे वैभव वाढले, पण ग्रामीण भाग उजाड झाला. जेव्हा अन्यायाची परिसीमा शिगेला पोचते तेव्हा पीडित समूहाचा प्रक्षोभ होणारच. देशाचा तारणहार, कणा, भाग्यविधाता वगैरे अलंकार, विशेषणांनी युक्त असणारा शेतकरी वर्षानुवर्षे देशोधडीला लागल्यानंतर अन्यायाच्या परिमार्जनाकरिता एकवटतो, क्षुब्धही होतो, रस्त्यावर येतो, थोडी मोडतोडीची भाषाही बोलतो, तर केवढा गहजब?

*नागपूर, तरुण भारत,*
*२/११/९४ वरून साभार.*

# आंध्र प्रदेशात कापूस विकण्यात शेतकरी संघटनेला घवघवीत यश

महाराष्ट्र शासनाच्या कापूस परराज्यात न विकण्याच्या आदेशास झुगारून शेतकरी संघटनेच्या पाठबळाने अनेक शेतकऱ्यांनी त्यांचा कापूस आंध्र प्रदेशात नेऊन जादा भावाने विकला.

दि. २३ नोव्हेंबर १९९४ रोजी शेतकरी संघटनेने घोषित केल्याप्रमाणे परभणी जिल्ह्यातून शेकडो कापसाचे ट्रक बँड ताशे वाजवत व शेतकरी संघटनेच्या घोषणा देत आंध्र प्रदेशातील – म्हैसा येथील बाजार पेठेत नेऊन विकले. कळमनुरी, औंढा नागनाथ, जिंतुर, सेलू, पाथरी, वसमत, परभणी, पुर्णा, पालम, गंगाखोड तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांची कापसाची वहाने नाना पाटील ब्रिगेडच्या संरक्षणात बारडफाटा मार्गे म्हैसा येथे नेली.

बारडा फाट्यावर या रॅलीचे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फटाके वाजवून व शरद जोशी झिंदाबाद घोषणा देत स्वागत केले. कंधार, नांदेड व भोकर तालुक्यातील दीडशे कापसाची वाहने या रॅलीत सहभागी झाली. श्री. शंकर धोंडगे, उत्तमराव कदम, सौ. कासराळीकरताई विश्वनाथ पाटील हंगर्गेकर व शेकडो कार्यकर्त्यांनी या रॅलीचे बारड फाट्यावर स्वागत केले व भोकर पर्यंत रॅली बरोबर सहभागी झाले.

शेतकरी संघटनेने एकाधिकार कापूस खरेदीचा कायदा मोडून कापूस वाजत गाजत आंध्रात नेला. ही रॅली पाहाण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा आपापल्या गावांमध्ये शेतकरी महिला व तरूणांनी एकच गर्दी केली होती. सर्व वाहनांवर शेतकरी संघटनेचे ध्वज फडकत होते. वाहनावर शेतकरी संघटनेचे बॅनर व शरद जोशी यांची छायाचित्रे कार्यकर्त्यांनी लावलेली होती. बळीराज्य येत असल्याच्या आनंदात वाहने आंध्र प्रदेशात म्हैसा येथे पोहचली.

**शेतकऱ्यांवर आंध्र प्रदेश पोलीसांचा लाठी हल्ला**

नाना पाटील ब्रिगेडच्या जीप मागे पुढे कापसाच्या वाहनांसोबत होत्या. म्हैसा बाजारपेठेत पहिल्यांदाच परप्रांतातून वाजत गाजत, कुठलाही टॅक्स न भरता व पोलीसांना भीक न घालता रॅली आल्याचे दुःख महाराष्ट्र पोलीसांना व आंध्र पोलीसांना झाले.

बाजारपेठेतील मुख्य रस्ता एक तास वाहनांच्या गर्दीमुळे ब्लॉक झाल्याचे निमित्त करून बिल्लाधारी शेतकऱ्यांवर म्हैसा येथील पोलीसांनी लाठी हल्ला केला त्यात अनेक जण जखमी झाले.

या हल्ल्याची वरिष्ठाकडे शेतकरी संघटनेने तक्रार केली व वाहने बाजूला काढून कार्यकर्त्यांनी रस्ता मोकळा करून दिला. काही वाहने अदिलाबादला गेली तर तेथेही पोलीसांनी या शेतकऱ्यावर कुठलेही कारण नसतांना लाठीहल्ला केला. म्हैसा येथे लाठी हल्ला शेतकऱ्यांवर झाला पण कोणीही पळून गेले नाही. पोलीसांनी शेतकरी संघटनेचे रॅलीबरोबर गेलेले ब. ल. तामसकर यांना अटक केली व संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आर.टी.ओ. यांना मारहाण केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करून पोलीस कोठडीत डांबले. प्रभाकर चव्हाण, मुंजाजी देशमुख इत्यादी अनेक कार्यकर्त्यांना पोलीसांनी पकडून जबर मारहाण केली यांचा संघटनेने तीव्र धिक्कार केला. ब. ल. तामसकर यांनी पोलीस कोठडीत शेतकऱ्यांवर केलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ २४ तासाचे उपोषण केले. २४ नोव्हेंबर रोजी ब. ल. तामसकर, प्रभाकर चव्हाण यांच्यावर आंध्र प्रदेशा पोलीसांनी अधिकाऱ्यांना मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करून कोर्टापुढे उभे केले.

म्हैसा येथील व्यापाऱ्यांनी रोख १३ हजाराचा जामीन देऊन ब. ल. तामसकर व प्रभाकर चव्हाण यांची सुटका केली. व्यापाऱ्यांनी परभणी नांदेडहून आलेल्या सर्व वाहनांतील कापूस दोन हजार एकशे रुपये प्रति क्विंटल देऊन खरेदी केला.

या रॅलीत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना महाराष्ट्रातील कापसाच्या किंमतीपेक्षा दीडकोटी रुपये म्हणजेच महाराष्ट्रापेक्षा प्रति क्विंटल ८०० रूपये जादा मिळाला, त्यापेक्षाही वाघ शेतकरी कापसाला रोख भाव घेऊन परतले यांचा आनंद शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

प्रेषक :
**ब. ल. तामसकर**

# शेतकरी संघटनेचे कापूस सीमापार आंदोलन यशस्वी

शेतकरी संघटनेच्या नागपूर अधिवेशनात (११-१२ नोव्हेंबर १९९४) ठरल्याप्रमाणे शेतकरी आपला माल मनाला येईल त्या ठिकाणी विकू लागले आहेत.

विदर्भ मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकरी मध्य प्रदेश व आंध्र प्रदेशमधील बाजारपेठांत कापूस घेऊन जात आहेत. सरकारी पोलिसांचा या मुक्त शेतकऱ्यांना त्रास होऊ नये म्हणून ते रॅलीच्या स्वरूपात जातात, त्यांच्या सोबत शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही असतात.

महाराष्ट्र शासनाने एकाधिकार योजनेच्या मक्तेदारी खरेदीत हमी किंमतीत ५९० ते ६४५ रूपयांच्या 'बोनस'ची भीक वाढवून कापसाला १६५० ते १८०० रूपये भाव देण्याची तयारी दाखविली. पण मध्य प्रदेशात व आंध्र प्रदेशात कापूस घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल २००० रूपयांपेक्षा जास्त भाव मिळत आहे. पांढुर्णा (२३०० रु.), बऱ्हाणपूर (२२५० रु.), आदिलाबाद (२३०० ते २४०० रु.), भैसा (२३०० रु.) असे काही बाजारपेठांतील भाव आहेत.

२३ नोव्हेंबर १९९४ रोजी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या संरक्षणाखाली चंद्रपूर (७० गाड्या), वर्धा (२५ गाड्या), नागपूर (६ गाड्या), अमरावती (६० गाड्या), अकोला (५५ गाड्या), परभणी (६०० गाड्या), नांदेड (२५० गाड्या), बुलढाणा या जिल्ह्यांतून कापूस शेजारच्या राज्यात विक्रीसाठी नेला. शेतकऱ्यांचा खुल्या व्यवस्थेच्या स्वीकाराचा निर्धार लक्षात घेऊन काही किरकोळ अपवाद वगळता, पोलिसांनी एन्ट्री फीसाठी गाड्या अडविण्याची आपली पद्धती या वेळी बंद ठेवून फक्त बघ्याची भूमिका घेतली.

बुलढाणा जिल्ह्यात शेतकऱ्यांनी २३ नोव्हेंबरला १०० गाड्या उसाची विक्री झोनबंदी तोडून केली व या आंदोलनात भाग घेतला.

कापूस एकाधिकार खरेदी योजनेला टाळून शेतकरी इतर राज्यात चोरून कापूस विकतात, असा आरडाओरडा पुढारी करतात. आता शेतकरी उजळ माथ्याने वाजतगाजत परराज्यात कापूस विकून ज्यादा किंमत मिळवत आहेत हे पाहून आपलाही कापूस ते शेतकऱ्यांच्या रॅलीमध्ये चोरून घुसवू लागले आहेत. परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रॅलींमध्ये सर्वश्री नखाते (माजी मंत्री), बोर्डीकर, जामकर, कराळे, भरोसे, वरपुडकर इत्यादी पुढाऱ्यांनी आपल्या कापसाच्या गाड्या दुसऱ्यांच्या नावे रॅलीत घुसवून कापसाला महाराष्ट्र सरकारने देऊ केलेल्या किंमतीपेक्षा जास्त किंमत मिळविल्याची खात्रीशीर माहिती कार्यकर्त्यांना मिळाली आहे.


२३ नोव्हेंबर १९९४ च्या या रॅलीनंतर सर्व कापूस उत्पादक जिल्ह्यांतून शेतकरी 'नाना पाटील ब्रिगेड'च्या संरक्षणाखाली 'माल आमुचा, मालक आम्ही' अशी घोषणा देत आपला कापूस शेजारच्या राज्यांत घेऊन जात आहेत आणि 'माना'चा भाव घेऊन ताठ मानेने घरी परतत आहेत. ●

## कोकणातील प्रचाराची जबाबदारी

शेतकरी संघटनेच्या नागपूर अधिवेशनाच्या कार्यक्रमांच्या प्रसारासाठी आणि अंमलबजावणीसाठी काही जिल्ह्यांची विशेष जबाबदारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर पुढीलप्रमाणे सोपविण्यात आली आहे.

| जिल्हा | कार्यकर्ता |
|---|---|
| रत्नागिरी | श्री. पाशा पटेल अध्यक्ष, शेतकरी संघटना |
| सिंधुदुर्ग | आ. वामनराव चटप चंद्रपूर |
| ठाणे | ॲड. मारेश्वर टेमुर्डे अध्यक्ष, शेतकरी संघटना समिती |
| रायगड | आ. डॉ. वसंतराव बोर्डे |

**शेतकरी प्रकाशन : २०**
**शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेचा सुरूवातीपासून आढावा घेणारी पुस्तिका प्रकाशित झाली आहे.**
**पुस्तिकेची किंमत रुपये १०/- मात्र.**



# शेतकरी महिला आघाडी - जिल्हा अधिवेशने
# श्री. शरद जोशी यांचा दौरा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | डिसेंबर १९९४ | नागपूर | २० | डिसेंबर १९९४ | बीड |
| ८ | डिसेंबर १९९४ | भंडारा | २१ | डिसेंबर १९९४ | उस्मानाबाद |
| ९ | डिसेंबर १९९४ | गडचिरोली | २२ | डिसेंबर १९९४ | सोलापूर |
| १० | डिसेंबर १९९४ | चंद्रपूर | २३ | डिसेंबर १९९४ | सांगली |
| ११ | डिसेंबर १९९४ | वर्धा | २४ | डिसेंबर १९९४ | कोल्हापूर |
| १२ | डिसेंबर १९९४ | यवतमाळ | २५ | डिसेंबर १९९४ | सातारा |
| १३ | डिसेंबर १९९४ | अमरावती | २६-२७ | डिसेंबर १९९४ | विश्रांती |
| १४ | डिसेंबर १९९४ | अकोला | २८ | डिसेंबर १९९४ | अहमदनगर |
| १५ | डिसेंबर १९९४ | बुलढाणा | २९ | डिसेंबर १९९४ | औरंगाबाद |
| १६ | डिसेंबर १९९४ | जालना | ३० | डिसेंबर १९९४ | जळगाव |
| १७ | डिसेंबर १९९४ | परभणी | ३१ | डिसेंबर १९९४ | धुळे |
| १८ | डिसेंबर १९९४ | नांदेड | १ | जानेवारी १९९५ | नाशिक |
| १९ | डिसेंबर १९९४ | लातूर | | | |

या दौऱ्यात प्रत्येक जिल्ह्यात महिला अधिवेशने आयोजित केली असून त्यांत महिला प्रश्न, शासनाचे महिला धोरण, माजघर शेती व त्या संदर्भात 'शिवार'चे व्यापार शेतीच्या भूमिकेतून स्थान इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात येईल. तसेच शेतकरी संघटनेच्या 'स्वतंत्र भारत' पक्षासंबंधीच्या भूमिकेचे विश्लेषण करण्यासाठी सायंकाळी किंवा रात्री एक जाहिर सभा आयोजित करण्यात येईल.

या संपूर्ण दौऱ्यात शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर व स्वतंत्र भारत पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे निमंत्रक ॲड. मोरेश्वर टेमुर्डे हे दोघे सहभागी होणार आहेत. ज्या जिल्ह्यांत आवश्यकता भासेल तेथे शेतकरी संघटनेच्या जिल्हा कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्यात येणार आहेत. ●


# शिवार ॲग्रो प्रॉडक्टस् लि.

शेतकऱ्यांनी तयार केलेल्या ''माजघर शेती'' च्या पदार्थांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट समोर ठेवून 'शिवार'ची घोषणा १० नोव्हेंबर ९१ ला शेगांव येथील मेळाव्यात करण्यात आली. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व तऱ्हेच्या मालाची विक्री करणाऱ्या दुकानांचे जाळे सुरुवातीला महाराष्ट्रात आणि नंतर देशभर उभारण्याची योजना आखण्यात आली. भांडवल उभारणीचा पहिला हप्ता औरंगाबाद अधिवेशनात पुरा झाला. आता शिवारच्या कामाला ठोस सुरुवात झाली आहे. "शिवार सुपर-शॉप्स्" उभारण्याकरिता वेगवेगळ्या ठिकाणी कमी जास्त जागेची आवश्यकता असते. अनेक ठिकाणच्या सुपर शॉप्सचे प्रस्ताव कार्यालयाकडे आलेले आहेत. त्या पैकी ३-४ सुपर शॉप्स् येत्या एक-दोन महिन्यात सुरू होत आहेत.

सप्टेंबर ९४ पासून शिवारच्या भांडवल उभारणीची दुसरी फेरी सुरू केली आहे. याला सर्व ठिकाणांहून उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. अनेक जणांनी मनीऑर्डरद्वारे रु. १००/- भरून नोंदणी केली आहे. या शिवाय, भांडवल उभारणी संदर्भात असंख्य पत्र रोज कार्यालयाकडे येत आहेत म्हणून या संदर्भात स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

शेअर्स पती-पत्नीच्या नावावर संयुक्तपणे घेता येतात. शिवारचे शेअर्स पतीपत्नीच्या नावावर घेता यावेत व आजपर्यंत ज्यांनी शेअर्स घेतले नाहीत त्यांना शेवटची संधी देण्याचे उद्दिष्टाने डिसेंबर ९४ अखेर पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात होणाऱ्या महिला अधिवेशनाच्या निमित्ताने शिवारचे शेअर्स देण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे.

आजच्या या संधीचा फायदा घेऊन रु. १००/- भरून शअर्सची नोंदणी पती पत्नीच्या नावावर करून आपल्या गृहलक्ष्मीला या कार्यात सहभागी करून घ्या आणि उर्वरित रक्कम 'शिवार ॲग्रो प्रॉडक्टस् लि.' या नावाने बँक ड्राफ्टच्या स्वरूपात पाठवा.

जानेवारी १९९५ मध्ये सर्व शेअर्स धारकांना शेअर सर्टिफिकेट पाठविण्यात येणार आहेत.

आदरणीय श्री. शरद जोशींच्या मार्गदर्शनात शिवारची उभारणी होत आहे. या प्रचंड कामाकरिता मोठ्या प्रमाणात भांडवलाची व आपल्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. तरी सर्वांनी आपापल्या विभागात शिवारच्या भांडवल उभारणीकरीता खास मोहिम हाती घेऊन मोठ्या प्रमाणात शेअर्सची रक्कम ताबडतोब शिवारच्या कार्यालयाकडे पाठवावी ही विनंती.

धन्यवाद.

**— लक्ष्मीकांत देशमुख**
कार्यकारी संचालक
**शिवार ॲग्रो प्रॉडक्टस् लि.**

रजि. ऑफिस : ४०२, 'कमलप्रभा', धंतोली, नागपूर ४४० ०१२.
फोन नं. : (०२१२) ५२१९३७, ५२३३१९, ५३५८०१
टेलक्स : ०७१५-७२७९ एस.एम.आई.एल-आई.एन

# मार्केट यार्डला नेहरूंऐवजी गांधीजींचे नाव

शेतकरी संघटनेच्या नागपूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी १९/११/१९९४ रोजी नागपूर येथील कळमना मार्केट यार्डाला 'महात्मा गांधी मार्केट यार्ड' असे नाव देऊन तेथे महात्माजींचे एक भव्य चित्रही लावले.

संपूर्णतः, शेतकऱ्यांशी संबंधित असलेल्या या मार्केट यार्डाला २१/११/१९९४ रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते, देशाला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर महात्माजींचा मार्ग सोडून शेतकरीविरोधी धोरण राबविणाऱ्या व त्याचा वारसा आपल्या पुढील पिढ्यांना देऊन शोषण चालू ठेवण्यास कारणीभूत ठरलेल्या पंडित नेहरूंचे नाव देण्यात येणार होते. शेतकऱ्यांनाच नव्हे तर अख्ख्या देशाला बरबाद करून टाकणाऱ्या अर्थनीतीला जन्म देणाऱ्या व्यक्तीचे स्तोम माजविणे यापुढे तरी बंद व्हावे अशी भावना नागपूरच्या कस्तुरचंद पार्कवर १२ नोव्हेंबर १९९४ रोजी लाखो शेतकरी स्त्रीपुरुषांनी घोषणांच्या गजरात व्यक्त केली. त्या घोषणांचा आवाज दुमदुमत असतांनाच त्याच नागपुरात मार्केट यार्डाला पं. नेहरूंचे नाव देणे म्हणजे नेहरूनीतीने जखमी केलेल्या शेतकरी समाजाच्या जखमांवर मीठ चोळणे होय. त्यामुळे सर्वश्री राम नेवले, किशोर माथनकर, मदन कामडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेच्या नागपूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी २० तारखेला रातोरात जाऊन या मार्केटला महात्मा गांधींचे नाव दिले. पोलिसांनी नेत्यांसह २९ कार्यकर्त्यांना अटक करून दुसऱ्या दिवशी न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर उभे केले असता त्यांची प्रत्येकी ३०० रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सुटका करण्यात आली. पण पोलिसांनी त्यांना पुन्हा लगेच, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून अटक केली व दिवसभर इमामखाना पोलिस ठाण्यात ठेवून रात्री आठ वाजता मध्यवर्ती कारागृहात नेऊन डांबले.

गांधीजींच्या नावाचा आग्रह धरणारांना तुरुंगवासाची शिक्षा. कारण पुढारी, पोलिस, नोकरशहा सर्वांनाच पं. नेहरूंच्या नावाशी ईमानदारी दाखविलीच पाहिजे, त्यांच्या नीतीमुळेच तर या सर्वांची आणि त्यांच्या गुंडपुंड सग्यासोयऱ्यांची चांदी झाली. मग, बळीराजाच्या हाती भिकेची झोळी का येईना? ●

## अज्ञान गृहमंत्र्यांचे, अटक शेतकऱ्यांना

दि. २ डिसेंबर १९९४ रोजी केंद्रातील गृहमंत्री श्री. शंकरराव चव्हाण कंधार येथे आयोजित शेतकरी मेळाव्यास हजर होते. त्यावेळी मेळाव्यातील शेतकऱ्यांनी त्यांना शासनाने शेतकऱ्यांवर लादलेल्या उणे सबसिडीसंबंधी खुलासा देण्याची मागणी केली. शेतकऱ्यांच्या या प्रश्नांना उत्तरे देण्याचे गृहमंत्र्यांनी नाकारल्याने शेतकऱ्यांनी घोषणा देत उत्तराचा आग्रह धरला. पोलिसांनी हस्तक्षेप करून शेतकरी संघटनेच्या शंभर पाईकांना अटक करून तुरुंगात डांबले. गृहमंत्र्यांच्या अज्ञानापायी किंवा उत्तर टाळण्याच्या पावित्र्यापायी शेतकऱ्यांना तुरुंगवासात जावे लागले.

दहा वर्षापूर्वीही श्री. शंकरराव चव्हाणांनी, त्यावेळी संरक्षणमंत्री असतांना त्यांना गावबंदी करून शेती अर्थव्यवस्थेसंबंधी प्रश्न विचारणाऱ्या शेतकऱ्यांची तोंडे पोलिसांकरवी बंद केली होती याची आठवण संघटनेच्या पाईकांना झाल्याशिवाय राहिली नाही.

## शरद जोशींवर गुन्हा दाखल

शरद जोशींनी १२ नोव्हेंबरला नागपूर अधिवेशनाच्या व्यासपीठावरून सांगितले – नेहरूनीतीच शेतकऱ्याच्या दारिद्र्यास, परिणामी देशाच्या अवनतीस कारणीभूत आहे. इदिराजींनी आपल्या वडिलांची आणि राजीवजींनी आपल्या मातोश्रींचीच नीती सुधारून वापरली आणि शेतकरी व देश अधिकाधिक दरिद्री होत गेला. सरकारने दिलेला उणे सबसिडीचा कबुलीजबाब हा त्याचा स्वच्छ पुरावा आहे. या मंडळींचे फोटो, तसबीरी, पुतळे आपल्या घरात असतील तर गुंडाळून ठेवा, सार्वजनिक संस्थांमधून तसे असल्यास तेथे ठराव करून काढून ठेवा.

हे झाले १२ नोव्हेंबरला आणि नागपूर पोलिसांनी श्री. शरद जोशींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कळमना मार्केट यार्डावरील ही घटना घडण्याच्या काळात. १२ नोव्हेंबरचे भाषण समजायला इतके दिवस लागले?

गुन्ह्याची कलमे काय आहेत?

गैरकायदेशीर मंडळी जमवून चिथावणी देणे व मालमत्तेची नासधूस करणे (भा.दं.वि. कलम ०९)

महात्माजींच्या आत्म्याला 'धन्य धन्य' झाले असेल – आपल्या विचारांचा आग्रह धरणाराला आणि तो विचार अंमलात आणण्याच्या मार्गाआड येणाऱ्या अडथळ्यांना दूर करण्याचे आवाहन करणाऱ्याला माझ्या 'पुत्रराष्ट्रा'त गुन्हेगार समजले जाते!

(पान ६ वरून)
संघटनेने आवाहन केले होते की शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी सर्व पक्षातील लोकांनी आपले पक्षाचे जोडे बाहेर काढून ठेवून संघटनेत यावे व शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्याचे एकत्र काम करावे, इतर वेळी पक्षाचे काम करायला ते मोकळे आहेत. त्यांना खुर्चीची भीती वाटत असेल तर मी सांगतो की मला खुर्चीत स्वारस्य नाही, स्वतःसाठी मतं मागायला मी आलो तर मला जोड्यानं मारा.

"राजकीय पक्षातील कोणीही जोडे बाहेर काढून शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी एकत्र येण्याचं आवाहन मानले नाही, अट पाळलेली नाही, मी केलेले विधान पाळायला मीही बांधलेलो नाही.

शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेसंबंधी टीका होणार आहे. माझ्यावर व्यक्तिशः तर होणारच आहे. त्या टीकेला समोर जायला, आणि उत्तर द्यायला मी समर्थ आहे. कार्यकर्त्यांनी त्याची काळजी करण्याची गरज नाही.''

**स्वतंत्र भारत पक्षाची बैठक,**

**दि. ११ नोव्हेंबर ९४, संध्याकाळी ५ वा.**

दि. ११ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता देशपांडे सभागृहातच स्वतंत्र भारत पक्षाची बैठक झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पक्षाध्यक्ष श्री. शरद जोशी होते. सरचिटणीस श्री. एस्. व्ही. राजू, राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य श्री. आनंदभाई अमीन, महाराष्ट्राचे निमंत्रक आ. मोरेश्वर टेमुर्डे, आ. वसंत बोंडे, आ. वामनराव चटप, आ. सौ. सरोज काशीकर हे पक्षाध्यक्षांबरोबर मंचकावर उपस्थित होते. बैठकीचे कामकाज हिंदीत झाले. बैठकीमध्ये शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पाशा पटेल, पक्षाचे सदस्य, आमदार व पदाधिकारी यांची भाषणे झाली. पक्षाच्या ध्येयधोरणात खुल्या व्यवस्थेचा अंगिकार, सरकारवाद, समाजवादाचा विरोध हे कार्यक्रम अंतर्भूत असतील असे मांडण्यात आले. पक्ष नोंदणीमध्ये जर समाजवाद मानणे सक्तीचे असेल तर पक्षनोंदणी न करता स्वतंत्रपणे पण समान चिन्ह मिळेल असे प्रयत्न करून निवडणुका लढवाव्यात असे ठरवण्यात आले.

**महिलांचे प्रतिनिधी अधिवेशन**

दि. १२ नोव्हेंबर १९९४ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळात कस्तुरचंद पार्क येथे महिलांचे प्रतिनिधी अधिवेशन झाले. अध्यक्षस्थानी सौ. सरोज काशीकर होत्या. अधिवेशनात निरनिराळ्या ठरावांसंबंधी राज्यभरातून आलेल्या महिला कार्यकर्त्यांची भाषणे झाली. महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाचा धिःकार, दारू दुकान बंदी आंदोलन व लक्ष्मीमुक्ती आंदोलन जोमाने चालू ठेवणे, खुली अर्थव्यवस्था राबवण्यात व कर्जवसुलीच्या प्रयत्नांच्या विरोधात शेतकरी संघटनेच्या बरोबरीने काम करणे इ. विषयांवर अधिवेशनात भाषणे झाली व ठराव करण्यात आले.

**ध्वजारोहण**

महिला आघाडीचे प्रतिनिधी अधिवेशन सुरू होताना व्यासपीठासमोरील स्तंभावर श्री. शरद जोशींनी शेतकरी संघटनेचा ध्वज फडकाविला. तेव्हा संपूर्ण कस्तुरचंद पार्क शेतकरी संघटनेच्या विजयघोषाने दुमदुमुन गेले.

**नागपूरातील शोभायात्रा**

नागपूर अधिवेशनाला लाखो शेतकरी मोठ्या प्रमाणावर ट्रक, टेम्पो, ट्रॅक्टर व जीपमधून आले होते. दि. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते २ या वेळात अशा शेकडो वाहनांची आणि वाहनात बसून आलेल्या शेतकऱ्यांची एक प्रचंड शोभायात्रा नागपूर शहरातील प्रमुख रस्त्यांवरून काढण्यात आली.

**प्रतिनिधी अधिवेशन सत्र-२**

प्रतिनिधी अधिवेशनाचे दुसरे सत्र १२ डिसेंबर ९४ रोजी दुपारी २ ते ५ वेळात कस्तुरचंद पार्कवर संपन्न झाले. या अधिवेशनास इतर राज्यातून आलेल्या शेतकरी नेत्यांची भाषणे झाली. गुजराथचे श्री. बिपीनभाई देसाई, कर्नाटकचे श्री. बसवराज तंबाके, म. प्र. चे श्री. अवनीशप्रताप, हरियाणाचे श्री. प्रेमसिंह दहिया, पंजाबचे श्री. भूपिंदरसिंह मान इ. वक्त्यांची या वेळी भाषणे झाली. त्याचबरोबर महाराष्ट्रातीलही श्री. शंकर धोंडगे, श्री. किशोर माथनकर, श्री. वामनराव चटप इ. वक्त्यांची भाषणे झाली. सर्वच वक्त्यांनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांच्या बाबतीत सरकारकडून खुल्या व्यवस्थेचा अंगिकार न होणे, सरकार समस्या सोडवू शकत नाही कारण सरकार हीच समस्या आहे, राजकीय लढाईची गरज आहे या मुद्द्यांवर भर दिला.

**खुले अधिवेशन**

खुले अधिवेशन दि. १२ रोजी सायंकाळी पाच वाजता सुरू झाले. अधिवेशनासाठी लाखोंच्या संख्येने शेतकरी

## कार्यकर्त्यांचा बंधुभाव

शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमाला जाताना कितीही गर्दी असली तरी स्टेशनवर दिसलेल्या बिल्लेधारकाला आपुलकीने डब्यात सामावून घेण्याची गोष्ट आता नेहमीचीच झाली आहे. नागपूर अधिवेशनाला जाणाऱ्या एका कार्यकर्त्याला एक पाकिट सापडले. पाकिटाच्या मालकाला लाखोंच्या गर्दीतून शोधून काढून सदर कार्यकर्त्याने ते पाकिट त्याच्या सुपूर्द केले त्याची माहिती –

कुमार पाटील के. के. ह्या हसूर ता. कागल, जि. कोल्हापूर येथील संघटनेच्या कार्यकर्त्याचे ओळखपत्र व २५०/- रुपयांचे पाकिट रेल्वे डब्यात पडले होते ते नागपूर अधिवेशनास येणाऱ्या श्री. बाळासाहेब हिंगे मालेगाव तालुका प्रमुख यांना मिळाले होते. श्री. हिंगे यांनी अधिवेशन कार्यस्थळावर कोल्हापूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी मुद्दाम संपर्क साधून श्री. बाबुराव मगदूम यांच्यामार्फत पैसे व कॉलेजचे ओळखपत्र कुमार पाटील ह्यास सुपूर्द केले. प्रामाणिकपणा ही शेतकरी संघटनेची संस्कृती आहे.

उपस्थित होते. आजवरची कस्तुरचंद पार्कवरची सर्वात मोठी सभा असे या अधिवेशनाचे नागपूरच्या वृत्तपत्रांनी एकमुखी वर्णन केले.

अधिवेशनात शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पाशा पटेल, महिला आघाडी अध्यक्ष आ. सौ. सरोज काशीकर, किसान समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. बिपीनभाई देसाई, पंजाबचे शेतकरी नेते खा. श्री. भूपिंदरसिंग मान यांनी विचार मांडले. श्री. शरद जोशींनी त्यांच्या भाषणात नेहरूवाद, समाजवाद, सरकारवाद यांना तिलांजली देणे, कर्जवसुली अधिकाऱ्यांचे कर्जवसुली, जप्मी असे प्रयत्न हाणून पाडणे, खुल्या व्यवस्थेच्या राबवणुकीच्या विरुद्ध होणारे सर्व प्रयत्न हाणून पाडणे, त्यासाठी स्वतंत्र भारत ही लढाईची राजकीय आघाडी करून निवडणुका लढवणे व त्याद्वारे बळीराज्य स्थापन करणे यासाठी आंदोलनाचा कार्यक्रम जाहिर केला. त्यातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे-

१) घरोघरच्या नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या तसबिरी, फोटो इ. उतरवून ठेवणे.

२) सार्वजनिक संस्थांमधील नेहरू कुटुंबियांचे पुतळे, फोटो, संबंधित संस्थांमध्ये ठराव पास करून घेऊन उतरवणे.

३) या पुढे सरकारने या नेत्यांची स्मारके उभी करू नयेत असे सरकारला आवाहन करणे.

४) खुल्या अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीसाठी कापूस व ऊस शेतकऱ्यांनी जिथे भाव जास्त मिळेल तिथे शेतीमालाची विक्री करणे, या विक्रीला शेतकरी संघटनेचे संरक्षण.

५) कर्जवसुली अधिकाऱ्यांना तोंडाला काळे फासून गावाबाहेर हाकून लावणे.

६) कर्जमुक्ती ही कर्जमुक्ती नसून लूट वापसी आहे. ती पूर्णपणे मिळण्यासाठी 'स्वतंत्र भारता'ची निर्मिती. स्वतंत्र भारताने महाराष्ट्र विधानसभेच्या सर्व २८८ जागा स्वतंत्रपणे लढवणे व विजयी शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमुक्ती करणे.

७) शेती तोट्यात असेल तर जमिनी पडीक ठेवणे ही शेतकऱ्यांचा हक्क आहे. पडीक जमिनीचे कारण दाखवून राज्य सरकारचे मुख्यमंत्री शरद पवार जमिनी हडप करणार असतील तर त्याचा विरोध करणे. त्या विरूद्ध आंदोलन करणे.

८) आंदोलनाचा एक भाग म्हणून दि. १ डिसेंबर रोजी राज्यभर रास्ता रोको आंदोलन. पुढच्या आंदोलनाच्या कार्यक्रमात बेमुदत रास्ता रोको व रेल रोकोची शक्यता.

कार्यक्रमाच्या शेवटी शरद जोशींनी सर्वांना शेतकरी संघटनेची शपथ दिली.

●

**(पान १६ वरून)**

जिल्हा रूग्णालयात उपचार चालू आहेत.

## वणी रंभापूर येथेही पोलिसांची दंडेली

अकोला जिल्ह्यातील वणी रंभापूर येथे शांतपणे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर लाठीहल्ला करून त्यांच्या बैलगाड्यांची मोडतोड केली व ४० बैल कोडवाड्यात डांबून ठेवले.

पोलिसी अतिरेकाच्या या दोन घटना वगळता महाराष्ट्रात हे रास्ता रोको आंदोलन, शेतकऱ्यांची संख्या सर्वच ठिकाणी मोठी असतांना अत्यंत शिस्तीने व शांतपणे पार पडले. सर्वच ठिकाणी आंदोलक स्त्रीपुरूषांच्या तुलनेत पोलिसांची संख्या इतकी अपुरी होती की पोलिसांनी नावापुरते काही शेतकऱ्यांना कलम ६८ खाली अटक करून शेतकऱ्यांचे आंदोलन समाप्त झाल्यानंतर कलम ६९ खाली सोडून देण्याचे धोरण ठेवले.

आजपर्यंत (३/१२/९४) हाती आलेल्या माहितीनुसार –

| जिल्हा | आंदोलन ठिकाणे | अटक |
|---|---|---|
| नागपूर | ३५ | २५०० |
| भंडारा | २ | ७० |
| गडचिरोली | १ | ९३ |
| चंद्रपूर | २० | २००० |
| वर्धा | १५ | ४००० |
| यवतमाळ | २५ | २५०० |
| अमरावती | ३५ | २००० |
| अकोला | ४० | १५०० |
| बुलढाणा | २० | २३३८ |
| जालना | १२ | २५०० |
| औरंगाबाद | ३ | ६०० |
| परभणी | २० | ४७०० |
| लातूर | १५ | २००० |
| नांदेड | ४० | २५०० |
| बीड | ५ | १५० |
| उस्मानाबाद | ५ | १५० |
| सोलापूर | १० | १००० |
| सातारा | ३ | २०० |
| सांगली | ३ | ३५० |
| कोल्हापूर | २ | ५०० |
| अहमदनगर | ६ | ५५७ |
| नाशिक | १६ | ८४७ |
| धुळे | १५ | ८१५ |
| जळगाव | १३ | १३६६ |
| पुणे | २ | २०० |
| रायगड | १ | ५० |

अटक केलेल्या कार्यकर्त्यांची संख्या आंदोलनात हजर असलेल्या शेतकऱ्यांच्या संख्येच्या एक दशांशसुद्धा नव्हती. त्यामुळे जवळजवळ सर्वच ठिकाणी अटक होऊनही आंदोलन सुरूच राहिले.

खुल्या व्यवस्थेचा फायदा शेतकऱ्यांच्या पदरी पडू नये यासाठी केंद्र व राज्य सरकारे शेतीमालाचा व्यापार, निर्यात, प्रक्रिया, वाहतूक इत्यादींवर आधारित बंधने लादणे आयात करून भाव पाडणे तसेच शेतकऱ्यांच्या जमिनी 'पडित' म्हणून ताब्यात घेणे अशा कारवाया करीत आहेत. सरकारांच्या या शेतकरीविरोधी कारवायांना असलेला आपला विरोध व त्याची तीव्रता १ डिसेंबर १९९४ च्या 'रास्ता रोको' आंदोलनाने शेतकऱ्यांनी स्पष्ट केली आहे. या विरोधाची दखल घेऊन, सरकारांनी आपल्या शेतकरीविरोधी कारवाया थांबवून शेतकऱ्यांना एक उद्योजक म्हणून आपला व्यवसाय करण्याच्या दृष्टीने खुल्या व्यवस्थेच्या मार्गातील अडथळा दूर केला नाही तर शेतकरी संघटना लवकरच अनिश्चितकालीन 'रेल व रास्ता रोको' आंदोलन करणार आहे. या आंदोलनाची तारीख व निश्चित दिवस नंतर जाहिर करण्यात येईल.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On December 8, 1994

**To**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
December 6, 1994

**PNCW 281**
Licence
to post
without
prepayment
**No. 87**

# नेहरूव्यवस्थेतील शेतकरीविरोधी धोरणाच्या विरोधात शेतकरी संघटनेचे यशस्वी रास्ता रोको यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी येथे पोलिसांचा गोळीबार

शेतकरी संघटनेच्या नागपूर अधिवेशनात (१२ नोव्हेंबर १९९४) घोषित झाल्याप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात शेतकरी स्त्रीपुरूषांनी प्रचंड संख्येने सहभागी होऊन १ डिसेंबर १९९४ रोजी अत्यंत शांततेने व शिस्तीने रास्ता रोको आंदोलन करून शासनाने चालू ठेवलेल्या शेतकरीविरोधी नेहरूनीतीवरील आपला रोष प्रकट केला.

यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी व अकोला जिल्ह्यातील वणी रंभापूर ही दोन ठिकाणे वगळता सर्व ठिकाणी हे आंदोलन शांतपणे व शिस्तीने पार पडले. अडून राहिलेल्या वाहनांतील प्रवाशांनी शेतकऱ्यांची भूमिका समजावून घेतली. हिवरी व वणी रंभापूर या ठिकाणी पोलिसांच्या आडमुठेपणामुळे पोलिस व शेतकरी यांच्यामध्ये संघर्ष तयार झाला.

**हिवरी येथील गोळीबारात तीन जण जखमी**

यवतमाळ जिल्ह्यात यवतमाळ-आर्णी मार्गावर यवतमाळपासून २० कि. मी. अंतरावरील हिवरी या गावी सूर्योदयापासून शेतकरी स्त्रीपुरूषांनी आपल्या लेकराबाळांसह ठाण मांडून रास्ता रोको सुरू केले. सकाळी १० च्या सुमारास पोलिसांना १४ महिला व २ पुरुषांना अटक केली. तेव्हा वातावरण थोडे तापले. दुपारी १२ वा. एक रूग्णवाहिका शेजारील दुसऱ्या रस्त्यावरून जात असता कार्यकर्त्यांनी ती थांबवून रूग्णाची विचारपूस केली व गाडी जाऊ दिली. ही गाडी सायरन वाजवत सुरू होताच, आंदोलक स्त्रियांबरोबर असलेली मुले बालसुलभ वृत्तीने गाडीमागे धावली. त्या वेळी तेथे असलेल्या सहायक पोलिस निरीक्षक श्री. धुर्वे यांनी त्या मुलांना पकडून मारहाण सुरू केली. त्यामुळे जनसमुदाय खवळला. एवढ्याने भानावर येऊन सर्वांना शांत करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी श्री. धुर्वे यांनी पिस्तुलातून हवेत गोळी झाडली. त्याने संतप्त झालेले काही तरूण कार्यकर्ते त्यांच्या समोर छाती ताणून उभे राहिले आणि 'झाडा आमच्यावर गोळ्या' म्हणून त्यांना आव्हान दिले. एकूण प्रकाराने सुरू झालेल्या धावपळीचा फायदा घेऊन पोलिसांनी शेतकऱ्यांवर लाठीहल्ला केला व त्यानंतर पुन्हा गोळीबार केला. त्यात श्री. रमेश फुने यांच्या डाव्या बाजूकडील वरच्या बरगडीला गोळी लागून ती पाठीकडून बाहेर पडली; दिगंबर सरोदे यांच्या उजव्या गुढग्याला गोळीमुळे फ्रॅक्चर झाले तर आनंद किसना वाघाडे यांचा घोटा जायबंदी झाला. लाठीमारात रविंद्र काकस, दिलीप जोशी व वसंत खोडकुंभे हे तीन युवक कार्यकर्ते जबर जखमी झाले. या सहाही जखमींवर यवतमाळ

(पान १५ पहा)

## पोलिसांच्या अपराधावर पांघरूण घालण्याचे कारस्थान

हिवरी येथील गोळीबाराची बातमी कळताच शेतकरी संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते त्याच रात्री यवतमाळ व हिवरी येथे परिस्थितीची पाहाणी करण्यास गेले. इतरही विरोधी पक्ष नेते तेथे आले होते. यवतमाळ येथील अधिकाऱ्यांनी श्री. धुर्वे (सहा. पो. नि.) यांच्या रक्ततपासणीत रक्तामध्ये मद्यांश आढळल्याचे संघटनेच्या कार्यकर्त्यांना मान्यवर विरोधी पक्षनेत्यांच्या देखत सांगितले. पण आता शासनातर्फे सुरू केलेल्या चौकशी (नाट्या) मध्ये मात्र अशाप्रकारे रक्ततपासणी झाल्याची नोंदच करण्यात आली नसल्याचे समजते. उलट, या ठिकाणी कोणीही पोलिस गंभीर जखमी झालेला नसताना ५४ आंदोलनकर्त्यांवर कलम ३०७ खाली गुन्हा नोंदवून त्यांना न्यायालयीन कोठडीत डांबून पोलिसांनी दहशत बसविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. याचा अर्थ श्री.धुर्वे व त्यांचे सहकारी पोलिस यांनी, शांतपणे सत्याग्रह करणाऱ्या शेतकऱ्यांवर गोळीबार करून केलेला अपराध लपविण्याचे कारस्थान सुरू आहे.

शेतकरी संघटना पोलिसांची ही क्रूर कारवाई राष्ट्रीय मानवअधिकार आयोग तसेच ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या संस्थांच्या निदर्शनास आणून देणार आहे. तसेच १२ डिसेंबर १९९४ रोजी यवतमाळ येथे पोलिसी गोळीबार व त्यामागील दोशी अधिकाऱ्यांच्या अपराधावर पांघरूण घालण्याचे कारस्थान यांच्या विरोधात तीन तासाचे धरणे धरणार आहेत. या धरण्यात शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी स्वतः भाग घेणार आहेत.

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**